| | | | |
|---|---|---|---|
| आंबा | देठासह पान | ४ ते ७ महिने वयाचे फांदीवरील मधले पान | १५ |
| पपई | शेंड्यापासून सहाव्या पानाचा देठ | लागवडीनंतर ६ महिन्यांनी | २० |
| काजू | पक्व फांदीवरील शेंड्याकडून चौथे पान | मोहोर येण्यापूर्वी | १५ |
| डाळींब | शेंड्याकडून आठव्या पानाची जुडी | कळी येताना | ५० |
| चिक्कू | शेंड्याकडून दहावे पान | सप्टेंबर | ४० |
| खरबूज व कलिंगड | शेंड्याकडून पाचवे पान | फुलांचे फळात रुपांतर होताना | १२ |
| घेवडावर्गीय सर्व पिके | शेंड्याकडून शेंड्याकडील पूर्ण विकसीत पान | | १० |
| कोबी | गड्ड्यालगतचे पान | २-३ महिने वयाचे | १५ |
| फुलकोबी | पूर्णपणे विकसीत व पक्व पान | गड्डा भरताना | १२ |
| वांगी | पूर्ण विकसीत पानाचा देठ व शिरा व्यतिरिक्त भाग | | १२ |
| कांदा | पूर्ण विकसीत पानाचा हिरवा भाग | पिकाचे निम्मे वय झाल्यावर | १२ |

जेव्हा कमतरतेची लक्षणे दिसतील तेव्हा चांगल्या प्रतीची पाने व कमतरतेची पाने पृथःकरणासाठी घ्यावीत. तसेच मुळांच्या कार्यकक्षेतील मातीचा नमुनासुध्दा दोन्ही झाडांखालील घ्यावा.जेव्हा पूर्ण क्षेत्रातील पाने एकसारखी असतील तेव्हा एकाच ठिकाणचा नमुना घेतला तरी चालेल. जेव्हा जमिनीमधील उंचसखलपणा, मातीची प्रत, झाडाचे वय, जात वेगळी असेल तेव्हा त्या भागातील नमुना वेगळा घ्यावा.

पान व देठ नमुन्यातील केवळ एक ग्रॅम सँपल पृथःकरणासाठी आवश्यक असते. सर्वसाधारणपणे ८ ते १५ पानांचा नमुना घ्यावा. ज्या पिकांची पाने व देठ आवश्यक आहे अशा पिकांची १५ ते २० पाने घ्यावीत.

पाने व देठ पृथःकरणासाठी नमुना कशा पध्दतीने घ्यावा?




## मातीचा नमुना असा घ्यावा-

मातीचा रंग, जमिनीचा खडकाळपणा, उंचसखलपणा, पिकातील फरक याप्रमाणे शेताचे भाग करावेत. प्रत्येक भागातून वेगवेगळे नमुने घ्यावेत.

मातीचा नमुना पिके काढल्यानंतर खते देण्यापुर्वी घ्यावा.

एका क्षेत्रातून सात ते आठ ठिकाणी खड्डे घ्यावेत. V आकाराचा पिकांच्या मुळांच्या विस्तारानुसार ३० सेमी ते ४५ सेमी खोलीचा खड्डा घ्यावा. खड्ड्याची एक बाजू कापून घ्यावी. नवीन फळबागांसाठी नमुने घेताना ०-३० सेमी, ३१-६० सेमी, ६१-९० सेमी प्रमाणे तीन थरातील माती नमुन्यासाठी वेगळी घ्यावी. जुन्या फळबागेतील नमुना घेताना दोन झाडांच्या ओळीतील खोडापासून ३० सेमी बाजूला व ०-४५ सेमी खोलीवर घ्यावा. सात ते आठ ठिकाणची गोळा झालेली माती एकत्र मिसळावी मातीचे सारखे चार भाग करावेत. समोरासमोरचे दोन भाग घ्यावेत. यापध्दतीने एक किलो माती नमुना म्हणून पाठवावी.


लेख संकलन

**श्री. विवेक भोईटे**
विषय विशेषज्ञ (मृदा शास्त्र),
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

**डॉ. सय्यद शाकीर अली**
प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ,
कृषि विज्ञान केंद्र, बारामती


Agricultural Development Trust Baramati

# माती परीक्षण नमुना असा घ्यावा!





निर्मिती अर्थसहाय्य :

**प्रकल्प संचालक आत्मा, पुणे**

कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे –४११ ००५
फोन :०२०–२५५३०४३१
E-mail : pdatmapune@gmail.com

तांत्रिक लेखन व प्रकाशन:

**कृषि विज्ञान केंद्र, बारामती**

माळेगांव खुर्द, बारामती, पुणे –४१३ ११
फोन :०२११२-२५५२०७, २५५२२७
E-mail:kvkbmt@yahoo.com
Web: www.kvkbaramati.com

## दरवर्षी करावे माती परीक्षण

वर्षातून दोन ते तीन वेळा पिके घेतल्यास मातीचा नमुना दर वर्षी घेणे आवश्यक असते. नत्र या अन्नद्रव्याचे जमिनीतील प्रमाण दर वर्षी बदलत असल्याने नत्राचे प्रमाण तपासण्यासाठी मातीचा नमुना दर वर्षी घ्यावा. पिकाला सेंद्रिय किंवा रासायनिक खत दिल्यानंतर तीन महिन्याच्या आत मातीचा नमुना घेऊ नये. सामान्यतः मातीचा नमुना तीन ते चार वर्षानंतर एकदा घेतला तरी चालतो. परंतू वर्षातून दोन ते तीन वेळा पिके घेतल्यास मातीचा नमुना दरवर्षी घेणे आवश्यक असते. नत्र या अन्नद्रव्याचे जमिनीतील प्रमाण दरवर्षी बदलत असल्याने नत्राचे प्रमाण तपासण्यासाठी मातीचा नमुना दरवर्षी घ्यावा. एप्रिल, मे महिन्यामध्ये मातीचे नमुने घ्यावे. पिकाला सेंद्रिय किंवा रासायनिक खत दिल्यानंतर तीन महिन्याच्या आत मातीचा नमुना घेऊ नये. मातीचा रंग, जमिनीचा खडकाळपणा, उंचसखलपणा, बागायत किंवा जिरायत स्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे शेतीचे अर्धा ते दोन हेक्टरचे वेगवेगळे भाग पाडावेत. प्रत्येक भागातील नमुने घ्यावेत. मातीचा नमुना प्रातिनिधीक असावा. निवडलेल्या शेताच्या मध्यरेषेच्या दोन्ही बाजूस ५ ते ६ वळणे असलेल्या रेषा काढाव्यात. या रेषा जमिनीच्या लांबी, रूंदीनुसार कमी जास्त अंतरावर असाव्यात. प्रत्येक वळणावर खुणेसाठी फांदी अगर दगड रोवावा. त्या प्रत्येक खुणेजवळील पालापाचोळा, तण काढूण टाकावे. त्या ठिकाणी इंग्रजी 'व्ही' आकाराचा २० से.मी. खोलीचा खड्डा घेऊन खड्ड्यातील माती बाहेर काढावी. त्यानंतर खड्ड्याच्या एका बाजूची साधारण चार से.मी. जाडीची माती खुरप्याने तासून ही माती घमेल्यात गोळा करावी. अशा पध्दतीने शेतातून १० ते १२ ठिकाणाहून मातीचे नमुने गोळा करावेत.

## मातीचा नमुना घेण्यासाठी खडयाची खोली

- **हंगामी पिकासाठी : २० ते २५ सेमी**
- **बागायती पिके ( ऊस, केळी, इ. ) : ३० ते ४० सेमी**
- **फळ पिके : ६० सेमी**

## खालील ठिकाणच्या मातीचा नमुना घेऊ नये

एका शेतातून गोळा झालेली माती एकत्र चांगली मिसळून ताडपत्रीच्या तुकड्यावर पसरावी. मातीतील खडे व मुळे काढून टाकावीत. त्यानंतर या मातीच्या नमुन्याचे चार समान भाग करावेत. समोरासमोरचे दोन भाग वगळून उरलेले दोन भाग पुन्हा एकत्र मिसळून त्याचे चार भाग करावेत. पुन्हा समोरासमोरील दोन भाग वगळावेत. अशा तहेने शेवटी दोन ओंजळी किंवा अर्धा किलो माती शिल्लक असेपर्यंत करावे. असा नमुना कापडी पिशवीत भरून माती परीक्षण प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावा.

- पाण्याच्या पाटाजवळील जागा
- दलदलीची जागा
- घराजवळील जागा
- जनावरे बांधण्याची जागा
- खते व कचरा टाकण्याची जागा

**माती नमुन्यासोबत द्यावयाची माहिती-**

१. नमुना क्रमांक.
२. नमुना घेतल्याची तारीख.
३. शेतकयाचा संपूर्ण पत्ता.
४. सर्व्हे क्रमांक किंवा ठिकाण(शेताचे नाव).
५. नमुन्याचे प्रातिनिधीक क्षेत्र ... एकर/हेक्टर.
६. जमिनीचा उतार... उताराची/सपाट.
७. काही विशेष लक्षणे : खारवट/चोपण/आम्ल/इतर.
८. पाण्याचा निचरा : चांगला/बरा/वाईट.
९. जमिनीची खोली... मीटर/सें.मी.
१०. प्रकार : बागायत/जिरायत.
११. मागील हंगामातील पीक व जात : खरीप.
१२. पुढील हंगामातील पीक व जात : रब्बी.

**• पान व देठाचा नमुना कधी घ्यावा ?**

झाडामधील अन्नद्रव्याचे प्रमाण तपासण्यासाठी कमतरतेचे लक्षणे दिसण्यापूर्वी किंवा फुलांच्या अवस्थेमध्ये घ्यावे. सकाळी अथवा दुपारी पानाचा नमुना घ्यावा.

**•कोणत्या ठिकाणी नमुना घ्यावा ?**

जेव्हा रोप ४इंचापेक्षा कमी उंचीचे असते, त्यावेळी जमिनीलगतचा १ इंचावरील भाग सोडून त्यावरील रोपाचा पूर्ण भाग घ्यावा. मोठ्या झाडांचा नमुना घेताना नुकतेच पक्व झालेले पान घ्यावे.

| पीक | नमुना | पीक अवस्था | नमुना संख्या |
|---|---|---|---|
| भात | शेंड्याकडून तिसरे पान | फुटवे अवस्था | १० |
| गहू | ओंबीलगतचे पान | ओंबी बाहेर येण्यापुर्वी | ५० |
| ज्वारी | कणसालगतचे पान | हुरडा अवस्था | २५ |
| मका | कणसालगतचे खालचे तिसरे पान | कणसाचा तुरा येण्यापुर्वी | १५ |
| कडधान्य पिके | नुकतेच पक्व झालेले पान | फुले येताना | ५० |
| बटाटा | पूर्ण वाढ झालेले पान | लागणीनंतर ३० दिवसांनी | १५ |
| भुईमूग | नुकतेच पक्व झालेले पान | फुटवे अवस्था | २५ |
| सुर्यफूल | पूर्ण वाढ झालेले पान | फुले येण्याची अवस्था | २० |
| सोयाबीन | शेंड्याकडून तिसरे पान | लागवडीनंतर दोन महिन्यांनी | २५ |
| कापूस | शेंड्याकडून चौथ्या पानाचा देठ | फुले लागण्याची अवस्था | ५० |
| ऊस | शेंड्याकडून तिसरे पान | ३.५ महिन्यानंतर | १५ |
| केळी | शेंड्याकडून तिसऱ्या पानाचा देठ | गर्भधारणा होताना लागवडीनंतर चार महिन्यांनी | १५ |
| अंजीर | नवीन फुटीवरील शेंड्याकडून खालच्या बाजूचे पूर्ण तयार पान | जुलै-ऑगस्टमध्ये | २५ |
| मोसंबी | नवीन फुटीवरील ३ ते ५ महिने वयाचे पान, शेंड्याकडून पहिले | जून | ३० |
| पेरू | नुकतेच पक्व झालेल्या शेंड्याकडून तिसऱ्या पानांची जुडी | फुले येण्याची अवस्था ऑगस्ट किंवा डिसेंबर | २५ |